# माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा 03/10/2024

अभिजात भाषा हा वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा आहे. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे निकष खालीलप्रमाणे ठरवलेले आहेत.

१)भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे.

२) भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे. ३)भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावे.

४) प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रुप यांचा गाभा कायम असावा .

हा दर्जा ज्या भाषांना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या-त्या राज्याला भरीव अनुदान मिळते. भारत सरकारने कालपर्यंत ६ भाषांना अभिजात दर्जा दिलेला होता. तमिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगु, मल्याळम आणि उडिया. दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी, पाली, प्राकृत, बंगाली आणि असामी या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.

मराठी भाषेतील ग्रंथधनाचे पुरावे बाराव्या–तेराव्या शतकापासून आढळतात.

'लीळाचरित्र', 'ज्ञानेश्वरी', 'विवेकसिंधू' यांसारख्या ग्रंथांचा आधार दाखविला जातो. "

अभिजात दर्जाचे भाषा संवर्धनासाठी पुढीलप्रमाणे फायदे आहेत :

१)मराठीच्या बोलींचा अभ्यास

२)संशोधन

३) साहित्यसंग्रह करणे

४)भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे.

५)प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे.

६)महाराष्ट्रातील सर्व १२००० ग्रंथालयांना सशक्त करणे.

७) मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा साऱ्यांना भरीव मदत करणे. इ. कार्य भविष्यात होऊ शकतात.

केंद्र सरकारकडून या सर्व कार्यासाठी मोठा भरून निधी मिळू शकतो.

यावर्षी रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ झाले आहे आणि आज ही आनंदाची बातमी आली आहे.